पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ 10 /2022                DATE :- 31 /01/2022

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

ज्याअर्थी, वागळे इस्टेट वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रामध्ये एम एम आर डी ए अंतर्गत मेट्रो टप्पा कमांक ०४ चे ( मॉडेला चेक नाका ते तिन हात नाका, कापूरबावडी जंक्शन ते गायमुख घोडबंदर रोड ) टाटा व रिलायन्स अस्टाल्डी कंपनी मार्फत कामे चालु आहेत. नमुद कामाचे अनुषंगाने कॅडबरी जंक्शन या ठिकाणी पिलर उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे विनियाना मॉल कॅडबरी जंक्शन सर्व्हिस रोडवर वाहतुक कोंडी होत आहे. सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित होणेसाठी सदरचा सेवा रस्ता एकेरी वाहतुक करणे आवश्यक आहे. त्याकरिता कॅडबरी जंक्शन ते विवियाना मॉल व चिरागनगर कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने व सदर परिसरातील वाहतुक कोंडी होवू नये याकरीता, आ: जनतेच्या सोयीसाठी,

त्याअर्थी, मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद** – १) कॅडबरी जंक्शन ते विवियाना मॉल/ चिरागनगर कडे सर्व्हिस रोडने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहतुकीस कॅडबरी जंक्शन सर्व्हिस रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सरदची वाहने कॅडबरी जंक्शन वरून मुंबई – नाशिक महामार्गाने ज्युपीटर हॉस्पीटल समोरील गॅपमधुन डावीकडे वळण घेवुन सर्व्हिस रोडने इच्छित स्थळी जातील.

सदरची अभिसूचना ही दि. ०१/०२/२०२२ ते दि. १०/०२/२०२२ रोजी पर्यत प्रायोगिक तत्वावर अंमलात राहील.

( बाळासाहेब पाटील )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,ठाणे
२/– सदरची अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– जिल्हाधिकारी, ठाणे
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

**प्रत माहितीसाठी,**

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**

सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, ठाणे शहर.
पोलीस निरीक्षक, वागळे वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

आवक क्रमांक · ९२५
दिनांक : १/५/२०२२

Scanned with CamScanner